महाराष्ट्र पोलीस

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ११ /२०२३ दि. २१/०१/२०२४

## –: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :–

**ज्याअर्थी,** उल्हासनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रात **उल्हासनगर** वाहतूक उपविभागाचे हद्दीत खासदार श्री. श्रीकांत शिंदे यांचे कार्यालयासमोर, गोल मैदान, उल्हासनगर १ येथे **'राम मंदिर प्राणप्रतिष्ठा'** निमित्त दि. २१/०१/२०२४ ते दि. २२/०१/२०२४ रोजी उद्घाटन सेटअप व महाआरती कार्यक्रम आयोजित करण्यात आलेले आहेत. सदर कार्यक्रमास असंख्य भाविक व विविध मान्यवर उपस्थित राहणार आहेत. सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी **डॉ. विनयकुमार मे. राठोड, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे. :–

**प्रवेश बंद व नो पार्किंग –** किशोर पॅटीस शॉप कडून गोल मैदान मुख्य प्रवेशद्वार कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **किशोर पॅटीस शॉप** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे. तसेच साधुवासवानी पुतळा चौक कडून गोल मैदान कडे जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **साधुवासवानी पुतळा चौक** येथे **'प्रवेश बंद' व 'नो पार्किंग'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –** अ) किशोर पॅटीस शॉप कडून साधुवासवानी चौक कडे जाणारी सर्व प्रकारची वाहने संत निरंकारी भवन – अल्फा मेडिकल समोरून साधुवासवानी चौक येथे पोहोचतील.

ब) साधुवासवानी चौक कडून किशोर पॅटीस कडे जाणारी सर्व प्रकारची वाहने अल्फा मेडिकल – संत निरंकारी भवन मार्गे किशोर पॅटीस शॉप येथे पोहोचतील.

सदर वाहतूक अधिसूचना दि. २१/०१/२०२४ रोजी रात्रौ ०१:०० ते दि. २२/०१/२०२४ रोजी रात्रौ १२:०० वाजेपावेतो अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

( डॉ. विनयकुमार मे. राठोड )
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर,**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, कल्याण.
मा. आयुक्त,उल्हासनगर महानगरपालिका.
मा. जिल्हाधिकारी, ठाणे

**प्रत कार्यवाहीसाठी** :–

उप प्रादेशिक परिवहन अधिकारी ,कल्याण

विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, कल्याण/विठ्ठलवाडी

पोलीस उपायुक्त, परिमंडळ–४, उल्हासनगर व विशेष शाखा, ठाणे

**प्रत** :– पोलीस उपायुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर

२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत** :– समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे

२/– सदरची अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

**प्रत** :– सपोआ उल्हासनगर वाहतूक उपविभाग/प्रभारी अधिकारी, उल्हासनगर, विठ्ठलवाडी, अंबरनाथ वाहतूक शाखा.